पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव   **P.S.(ठाणे):** जिल्हापेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0334   **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/11/2025 22:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 24/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/11/2025
**Time From (वेळेपासून):** 16:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/11/2025   **Time (वेळ):** 21:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 049

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/11/2025 21:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी   **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सार्वजनिक बांधकाम विभा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** सचिन साळुंखे
   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986
   (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
   **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9403747157

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | वासुदेव धोंडु पाथरवट | | | 1. 55,जळगाव रोड,मोहित नगर, भुसावळ,,जिल्हापेठ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 15,000/ रु.हस्तगत केलेली | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी सचिन शालीकराव साळुंखे, वय 39 वर्षे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस उपअधीक्षक या पदावर सुमारे दिड वर्षापासुन कार्यरत आहे. दि.22.11.2025 रोजी आम्हास दुरध्वनीवर तक्रारदार ईश्वर बाबुलाल बाविस्कर रा. भट्टगाव ता. भडगाव, जि. जळगाव यांनी त्यांच्याकडे जळगाव येथील लोकसेवक लाचेची मागणी करीत असुन तक्रारदार हे दि 24.11.2025 रोजी त्यांची भेट घेण्याकरीता त्यांचे कार्यालयात जाणार असल्याचे कळविले होते. त्यावरून आम्ही आज दि. 24.11.2025 रोजी मा. जिल्हा कृषी अधिकारी, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील श्री. हेमंत वासुदेव मराठे, लिपीक व श्री. श्रीकांत सुरेश राउत, लघुलेखक यांना उपलब्ध करून घेवुन आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकिय वाहन क्र. एम.एच.18 बीएक्स 0221 ने रवाना होवुन जळगाव शहरातील रिंग रोड लगत पियुष हॉस्पीटलसमोर पोहचलो. तेथे आम्हास ठरल्याप्रमाणे तक्रारदार हे भेटले. तेव्हा त्यांनी आम्हास पंचांसमक्ष त्यांच्या तक्रारीची तोंडी हकिगत सांगितली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली ती पुढील प्रमाणे ''मी मौजे वाकडी, ता. जामनेर, जि. जळगाव येथील गट नं. 139/1/पैकी/अ क्षेत्र 27 आर शेत जमिनीचे क्षेत्रापैकी 1225 चौ.मी. क्षेत्रामध्ये नियोजित पेट्रोलपंप सुरू करण्याकरीता शेत जमिनीचे मालक श्री. उखर्डु भावजी डिके यांच्याशी दि.20.09.2023 पासुन 20 वर्षासाठी भाडे करारनामा केला होता. त्यानंतर शेती मालक श्री. उखर्डु भावजी डिके यांनी मा.उपविभागीय अधिकारी, जळगाव यांचे कडुन सदर शेत जमिनीपैकी वाणिज्य प्रयोजनासाठी तात्पुरती अकृषक करून घेतली होती. त्यानंतर इंडियन ऑईल कंपनी, छत्रपती संभाजीनगर यांनी सदर जागेत पेट्रोलपंप सुरू करण्यासाठी मला अलॉटमेंट लेटर (एल ओ वाय) देवुन सदर क्षेत्रात पेट्रोलपंप सुरू करण्यास नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याकरीता दि. 19.07.2024 रोजी मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांना पत्र दिले होते.
सदर पत्रावरून मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दि. 26.07.2024 रोजी मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांना पत्र देवुन सदर क्षेत्रात नविन पेट्रोलपंप सुरू करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे अगर कसे ? याबाबत अभिप्रायासह अहवाल मागविला असल्याची माहिती मला मिळाल्यावरून मी माझे मित्र विनोद धनराज बागुल यांच्यासह सदर कार्यालयात वेळोवेळी जावुन संबंधीत कामकाज पाहणारे आरेखक श्री. वासुदेव पाथरवट यांचे भेट घेवुन त्यांना नाहरकत प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळणेकरीता विनंती करीत होतो. तेव्हा आरेखक पाथरवट यांनी माझे कडुन काम करून देणे करीता 2,000/-रू घेवुन काम झाल्यावर 15,000/-रू दयावे लागतील असे सांगितले होते. त्यानंतर दि. 21.11.2025 रोजी आरेखक पाथरवट यांनी माझे मित्र विनोद बागुल यांना फोन करून ''तुमचे मित्राच्या पेट्रोलपंपाची एन ओ सी तयार असुन त्यांना 15,000/-रू घेवुन एन ओ सी घेण्याकरीता कार्यालयात घेवुन या, पैसे दिल्याशिवाय ते एन ओ सी देणार नाही'' असा मला निरोप दिला होता. मी, माझे मित्र विनोद बागुल यांचेसह आरेखक श्री. वासुदेव पाथरवट यांना आज दि.24.11.2025 रोजी त्यांना भेटण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव कार्यालयात जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी

केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी हि विनंती आहे." सदरची तक्रार आम्ही व दोन्ही पंचांनी वाचुन सदर तक्रारी अर्जावर व त्यासोबतच्या कागदपत्रांवर सहया केल्या आहेत.
तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचांना सुचना देवुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन तक्रारदार व त्यांचे मित्र विनोद धनराज बागुल व पंच नं. 01 हेमंत मराठे यांना आरेखक पाथरवट यांची सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव येथे भेट घेण्यासाठी रिंग रोड, पियुष हॉस्पीटल जवळुन तक्रारदार यांचे दुचाकी क्र. एम एच 19 डि.सी. 9409 ने रवाना केले. काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 मराठे असे आरेखक पाथरवट यांची भेट घेवुन आमचे जवळ परत आले. तेव्हा तक्रारदार व पंच नं. 01 मराठे यांनी आरेखक पाथरवट व तक्रारदार यांचेत सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव येथे भेट होवुन तक्रारदार, तक्रारदार यांचे मित्र बागुल व आरेखक पाथरवट यांच्यात तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा आरेखक पाथरवट यांनी तक्रारदार यांना नकाशाची रंगीत झेरॉक्स करून आणण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार हे दुचाकीने झेरॉक्स आणण्यास गेले तेव्हा मी व तक्रारदार यांचे मित्र तेथेच थांबुन होतो. त्यानंतर तक्रारदार हे झेरॉक्स घेवुन आले. तेव्हा तक्रारदार यांच्या कामाबाबत पुन्हा चर्चा होवुन आरेखक पाथरवट यांनी तक्रारदार यांची एन ओ सी तयार असल्याचे सांगुन तक्रारदार यांच्याकडे आगोदर दिलेले 2,000/-रू तसेच तक्रार दार यांच्या नियोजीत पेट्रोलपंपास दिलेल्या जोड रस्त्याच्या एन.ओ.सी चे 5000/-रु व नियोजीत पेट्रोलपंप सुरु करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी जळगांव यांना अभिप्राय/एन.ओ.सी देण्याकरीता 10000/- रु असे एकुण 15,000/-रू दयावे लागतील असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी 10,000/-रू करून घ्या असे सांगितले. तेव्हा आरेखक पाथरवट यांनी त्यास नकार देवुन 15,000/-रूपये तक्रारदार यांना देण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या मुलीस मोबाईलचा स्पिकर सुरू करून फोन लावुन पैसे घेण्यास येतो आहे असे सांगुन सदरचे संभाषण आरेखक पाथरवट यांना ए‌ेकवुन मुलीकडुन पैसे घेवुन येतो असे सांगीतले तेव्हा तक्रारदार यांचे मित्र आरेखक पाथरवट यांच्याजवळ थांबुन राहिले व तक्रारदार व पंच नं. 01 मराठे असे दुचाकीने आमचे जवळ परत आले असल्याची हकिगत कथन केली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित झालेले तक्रारदार, तक्रारदार यांचे मित्र विनोद बागुल व आरेखक वासुदेव पाथरवट यांचेतील संभाषण ए‌ेकुन आरेखक पाथरवट यांनी तक्रारदार यांच्याकडे 15,000/-रू लाचेची मागणी केल्याची खात्री झाल्याने आम्ही आरेखक वासुदेव पाथरवट याचेवर सापळा लावण्याचा निर्णय घेतला.
त्यानंतर आम्ही सापळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला तेव्हा तक्रारदार यांच्याकडुन 500/- रुपये दराच्या 30 नोटा असे एकुण 15,000/- रुपये सापळाकामी घेवुन सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 मराठे यांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन त्यांना तक्रारदार यांच्या दुचाकीने आरेखक पाथरवट यांची भेट घेण्यासाठी जळगाव सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही शासकिय वाहनाने जावुन जळगाव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालया बाहेर वाहन उभे करून कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारतीचे बाहेर येवुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने आरेखक पाथरवट यांना ताब्यात घेतले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 श्रीकांत सुरेश राउत यांनी आरेखक पाथरवट यांच्या हातातील 15,000/- रुपये लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर पद्मालय विश्रामगृह जळगाव येथे येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा दोन्ही पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
अशाप्रकारे लोकसेवक वासुदेव धोंडु पाथरवट, आरेखक, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांनी या अगोदर तक्रारदार यांच्या नियोजित पेट्रोलपंपास दिलेल्या जोड रस्त्याचे एन.ओ.सी.चे 5,000/- रुपये व नियोजित पेट्रोलपंप सुरू करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी जळगाव यांना अभिप्राय/एन.ओ.सी. देण्याकरीता 10,000/-रू असे एकुण 15,000/- रू लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून तक्रारदार यांच्याकडुन 15,000/- रुपये लाचेची रक्कम त्यांचे सार्वजनिक बांधकाम विभाग जळगाव कार्यालयात 16:02 वाजता स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRADIP KHANDU THAKUR(I (Inspector)) / POB74236 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्यां पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही):

पोलीस ठाणे अंमलदार
शनिपेठ पो.स्टे.जळगांव

**Name** (नाव): PRADIP KHANDU TH.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POB74236